## स्पे.दि.मु. क्र. ४२/२०१४ मधील निशाणी १०३ वरील आदेश

सदरहू अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये अर्जात दुरूस्ती करण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात असे की,**

०२. वादीतर्फे प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूध वाटप, निरंतर ताकीदीकरीता व इतर मागणींकरीता दाखल केला आहे. वादीचे कथन असे की, सदर दाव्यात प्रतिवादी यांनी नि. ३४ येथे मूल्यांकनाबाबत दिलेला अर्ज मंजूर झाल्याने व त्यानुसार दावा मिळकतीबाबत जादा स्टॅम्प ड्यूटी देणेबाबत आदेश केल्याने दाव्याचे कामी आकारणीमध्ये त्यानुसार दुरूस्ती करणे आवश्यक झाले आहे. सदर आदेशामुळे दावा कलम १ ब या मिळकतीचे मूल्यांकन वाढत आहे. सबब, दावा कलम ११ मध्ये उपकलम ३ मध्ये ओळ क्र. २ मध्ये '' रूपये १०,००,०००/– या आकड्यास काट देवून तेथे रूपये १९,९८,५००/– अशी दुरूस्ती करणेस तसेच सदर उपकलमातील ओळ क्र. ३ मधील रूपये ३,३५,०००/– या आकड्यास काट देवून तेथे '' रूपये ६,६६,१६६/– अशी दुरूस्ती करणेस परवानगी मागितली आहे. सदर दुरूस्ती किरकोळ स्वरूपाची असून सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही.

०३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सादर करून विरोध दर्शविलेला आहे. वादी यांनी बराच उशीर केला असून स्टॅम्प दिला त्यादिवशीच अर्ज देणे उचित होते. सबब वरील कारणावरून अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. दोन्ही विद्वान वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते की, प्रस्तावित दुरूस्ती ही दावा कलम १ ब या मिळकतीचे मूल्यांकनाबाबत असून सदर दुरूस्ती अर्ज नि.क्र. ३४ वरील आदेशानुसार करणे क्रमप्राप्त झालेले आहे. सदर दुरूस्ती ही किरकोळ स्वरूपाची आहे. तसेच ही दुरूस्ती दावा दाखल झाल्यानंतर घडलेली घडामोड या संज्ञेत ही बसणारी आहे. सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. त्यामुळे, अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे निष्कर्षास मी येत आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### आदेश

१. अर्ज (निशाणी १०३) मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्यावी व सोबत दुरूस्ती अर्ज सादर करावा.

कराड. (सौ.वि.प्र. गायकवाड)

दिनांकः ०५.१२.२०१७ सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.